# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 30/11/2022 (बुधवार) सायंकाळ

---

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. खापा :— अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील मौजा कोदेगाव शिवार येथे दिनांक २९/११/२०२२ चे १४.०० वा. सुमारास नमुद घटनावेळी व ठिकाणी आदीत्य सत्यपाल कनोजीया, वय २१ वर्ष, रा. सावनेर हा आपली मोटरसायकल क्र. एम. एच ४०/ए.जे—८०४५ ने आपला मित्र नामे—लोकेश धनराज घरत, वय २२ वर्ष, रा. गणेशपुर, ता. वरूड, जि. अमरावती ह. मु सावनेर आपल्या सोबत डबल सीट बसवुन सावनेर ते पारशिवनी येथे जात असताना कोदेगाव जवळील पेट्रोल पंप टर्निंग जवळील हायवे रोडवर आरोपी ट्रक क्र एम. एच. ४०/एजे—८५५१ च्या चालकाने भरधाव वेगाने व निश्काळजीपणे चालवुन मोटार सायकलला जबर धडक देवुन दोन्ही ईसमास गंभीर जखमी करून त्यांचे मरणास कारणीभुत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— श्रीमती सिमा सत्यपाल कनोजीया, वय ४० वर्ष, रा. सावनेर यांचे रीपोर्ट वरून पोलीस स्टेशन खापा येथे आरोपी ट्रक चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कलेगुरवार पोलीस स्टेशन खापा मो. नं ९१७५५७९१४३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर